# गुजरातमध्ये एअर इंडियाचं विमान कोसळलं




दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 272 ■ शुक्रवार, दि. 13 जून 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




# विमान प्रवाशांवर काळाचा घाला



- अहमदाबादहून लंडनला जाणारे एअर इंडियाचे विमान कोसळले
- विमानात होते २४२ प्रवासी
- विमानात दोन वैमानिक आणि १० केबिन क्रू सदस्यही होते
- गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांचा अपघातामध्ये मृत्यू
- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केलं दुःख
- एक प्रवासी जिवंत आढळला असल्याचा गुजरात पोलिसांचा दावा


अहमदाबाद/वृत्तसंस्था :गुजरातमधील अहमदाबाद येथे एअर इंडियाचे प्रवासी विमान बोईंग ७३७ कोसळलं आहे. या विमानात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपानी सुद्धा असण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या विमानात २४२ प्रवासी होते. सर्वांचा मृत्यू झाल्याची भीती आहे. अपघाताचे भयानक फोटो समोर येत आहेत. अहमदाबादच्या मेघानीनगर भागात आगीच्या प्रचंड ज्वाळा दिसल्या. दूरवरून काळ्या धुराचे लोट दिसत होते. प्राथमिक माहितीनुसार, सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावर हा दुर्दैवी अपघात झाला. विमानतळाच्या सीमेजवळ हे विमान कोसळल्याचे मानले जात आहे. समोर आलेल्या सुरुवातीच्या छायाचित्रांमध्ये विमानाचे तुकडे झाले असल्याचे दिसून येते. मदत आणि बचाव कार्य सुरू आहे.

>> पान २



## माजी मुख्यमंत्री विजय रुपाणींचे अहमदाबाद विमान दुर्घटनेत निधन

**अहमदाबाद/वृत्तसंस्था** : आज अहमदाबादच्या मेघानीनगर येथे लंडनला जाणाऱ्या एअर इंडियाच्या विमानाला अपघात झाला. उड्डाण केल्यानंतर केवळ काही मिनिटांतच हे विमान रहिवाशी भागात कोसळले. यामध्ये २४२ प्रवासी प्रवास करत होते. त्यातल २४२ प्रवाशांचा मृत्यू झाल्याचे सांगितले जात आहे. अद्याप खरा आकडा समोर आला नाही. मात्र या दुर्घटनेत गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी यांचे निधन झाले आहे.



अहमदाबादवरून लंडनला जाणाऱ्या एअर इंडियाचे विमान मेघानीनगर परिसरात कोसळले. या विमानात २४२ प्रवासी होते. तर याच विमानातून गुजरत भाजपचे नेते. गुजरातचे माजी मुख्यमंत्री आणि चांदीगड, पंजाबचे प्रभारी विजय रूपाणी देखील प्रवास करत होते. दरम्यान गुजरात भाजपचे नेते आणि केंद्रीय मंत्री सी.आर. पाटील यांनी विजय रूपाणी यांच्या मृत्यूबद्दल सांगितले आहे.केंद्रीय मंत्री सी.आर. पाटील यांनी विजय रूपाणी यांच्या मृत्यूबद्दल सांगितले आहे.

काय म्हणाले सी. आर पाटील?

आमचे नेते, माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी त्यांच्या कुटुंबाला भेटण्यासाठी जात होते. या विमानातून ते प्रवास करत होते, या दुर्घटनेत त्यांचा मृत्यू झाला आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्याला शांती देवो.

## १५ डॉक्टर जखमी, रुग्णालयाचा टीबी विभाग उद्ध्वस्त!

अहमदाबाद : गुजरातच्या अहमदाबाद एअरपोर्टवरुन उड्डाण केलेल्या एअर इंडियाच्या विमानाचा गुरुवारी दुपारी भीषण अपघात झाला. या भीषण अपघातामध्ये एअर इंडियाचे बोईंग ड्रीमलायनर विमान पूर्णपणे उद्धस्त झाले आहे. या विमानाने दुपारी १ वाजून ३१ मिनिटांनी अहमदाबाद विमानतळावरुन उड्डाण केले होते. यानंतर १ वाजून ३८ मिनिटांनी विमानाचा शेवटचा सिग्नल नियंत्रण कक्षाला मिळाला. यानंतर हे विमान मेघानी नगर या दाट लोकवस्तीच्या

>> पान २

## अहमदाबाद एअरपोर्ट पुढील सूचनेपर्यंत बंद, युद्धपातळीवर बचावकार्य सुरु

**अहमदाबाद/वृत्तसंस्था :** गुजरातच्या अहमदाबाद मध्ये मोठी विमान दुर्घटना घडली आहे. अहमदाबादच्या मेघानी नगर परिसरात २४२ प्रवाशांना घेऊन जाणारे विमान दाटीवाटीच्या रहिवासी भागात कोसळलं. गुजरातहून लंडनला जाणाऱ्या एअर इंडिया एआय १७१ हे विमान अहमदाबाद च्या सरदार पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळाहून टेकऑफ केल्यानंतर अवघ्या काही मिनिटात क्रॅश झाले. तब्बल ७०० फुटांवरून हे विमान कोसळलं आहे. घटनास्थळी प्रचंड आग व धुराचे काळे लोट दिसत आहेत. अपघातानंतर अग्निशमन दलाच्या गाड्या दाखल झाले आहेत. पुढील सूचना मिळेपर्यंत अहमदाबाद विमानतळ बंद राहणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

दुपारी एक वाजून १७ मिनिटांनी अहमदाबाद विमानतळावरून उड्डाण केलेले एअर इंडियाचे प्रवासी विमान रहिवासी भागात काही मिनिटातच कोसळले. या विमानात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाने असण्याची शक्यता आहे. त्यांचा बोर्डिंग पासही समोर आल्याने मोठी खळबळ उडाली आहे.

एअर इंडियाच्या प्रवासी विमानाच्या अपघातानंतर पुढील सूचनेपर्यंत अहमदाबाद विमानतळ बंद राहणार असल्याची माहिती समोर आली आहे. आज दिल्लीहून अहमदाबाद ला जाणारी चार इंडिगो आणि पाच एअर इंडियाची उड्डाणे ही रद्द करण्यात आली आहेत. या अपघातानंतर सर्व विमानतळ मार्ग बंद करण्यात आले आहेत. >> पान २

## विमानात काढलेला तो सेल्फी ठरला शेवटचा!; डॉक्टर दाम्पत्यासह तीन मुलांचा अहमदाबाद विमान अपघातात मृत्यू

**अहमदाबाद/वृत्तसंस्था** : अहमदाबादहून लंडन या ठिकाणी निघालेल्या विमानाचा काही मिनिटांतच भीषण अपघात झाला. टेक ऑफ नंतर ८०० फुटांच्या वर गेलेलं विमान कोसळलं आणि यातल्या प्रवाशांचा मृत्यू झाला. नेमका किती जणांचा मृत्यू झाला हे अद्याप स्पष्ट करण्यात आलेलं नाही. विमानात क्रू मेंबर्ससह एकूण २४२ जण होते त्यापैकी एक प्रवासी वाचला आहे अशी माहिती मिळते आहे. दरम्यान या अपघाताच्या करुण कहाण्या आता समोर येत आहेत. एका डॉक्टरचं कुटुंबही असंच संपलं आहे. त्यांनी या विमानात कुटुंबासह काढलेला सेल्फी शेवटचा ठरला आहे. त्यामुळे हळहळ व्यक्त होते आहे.

>> पान २



## चमत्कार! भीषण विमान अपघातामधून ११अ सीटवर बसलेले रमेश विश्वासकुमार सुखरुप वाचले

**अहमदाबाद/वृत्तसंस्था** : अहमदाबाद येथून उड्डाण घेतलेल्या एअर इंडियाच्या विमानाला भीषण अपघात झाल्यानंतर विमानातील सर्व २४२ प्रवाशांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त केली जात होती. मात्र आता गुजरात पोलिसांनी एक प्रवासी जिवंत असल्याचे सांगितले आहे. ४० वर्षीय रमेश विश्वासकुमार हे या भीषण अपघातामधून बचावले आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीदेखील रमेश यांची रुग्णालयात भेट घेतली



असून त्यांच्या प्रकृतीविषयी विचारणा केली.

रमेश विश्वासकुमार हे सध्या उपचार घेत असल्याचा फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. तसेच अपघातानंतर स्वतःच्या पायावर चालत जात असल्याचा त्यांचा एक व्हिडीओही सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. रमेश विश्वासकुमार हे एअर इंडियाच्या विमानात ११अ या सीटवर बसले होते. त्यांचा बोर्डिंग पासही आता समोर आला आहे.

अहमदाबादचे पोलीस आयुक्त जीएस मलिक यांनी एएनआय वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले, ''११अ या सीटवर बसलेले प्रवासी सुखरुप आहेत. ते एका रुग्णालयात उपचार घेत असल्याचे आढळून आले. आतापर्यंत किती प्रवाशांचा मृत्यू झाला, याची नेमकी माहिती देता येणार नाही. विमान निवासी भागात कोसळल्यामुळे मृतांची संख्या वाढण्याची भीती आहे.''

## मृतांच्या नातेवाईकांना टाटा ग्रुपकडून १ कोटी रुपयांची मदत जाहीर; कोसळलेली इमारतही बांधून देणार

**अहमदाबाद/वृत्तसंस्था** : अहमदाबादहून लंडनला जाणाऱ्या एअर इंडियाच्या एआय-१७१ विमानाचा आज दुपारी भीषण अपघात झाला. या विमानातील एकूण २४२ प्रवाशांपैकी २४१ प्रवाशांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. तसेच हे विमान बीजे वैद्यकीय महाविद्यालयाच्या एका वसतिगृहाच्या इमारतीला जाऊन आदळले होते. या इमारतीमधील काही जणांचा मृत्यू झाल्याची माहितीही समोर येत आहे. यानंतर आता एअर इंडियाची मालकी असलेल्या टाटा ग्रुपने नुकसान भरपाई जाहीर केली आहे.

एअर इंडियाच्या विमानाला अपघात झाल्यानंतर संपूर्ण भारतासह जगभरातून शोक व्यक्त करण्यात येत आहे. जगातील अनेक देशांनी अपघाताबद्दल शोक व्यक्त करत



मृतांना श्रद्धांजली वाहिली.

टाटा सन्सचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन यांनीही या घटनेबद्दल दुःख व्यक्त केले. त्यांनी म्हटले की, या क्षणी आपल्या सर्वांना जे दुःख झाले आहे, ते शब्दात व्यक्त करता येणार नाही. ज्या कुटुंबांनी आपले जवळचे लोक गमावले आणि जे लोक

>> पान २

# जयंत पाटलांच्या राजीनाम्याची चर्चा, नवीन चेहऱ्यांना संधी शरद पवारांच्या राष्ट्रवादीत नेमकं काय घडतंय?

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) अध्यक्ष जयंत पाटील यांनी एका वर्षात दुसऱ्यांदा आपल्या पदाचा राजीनामा देण्याची ऑफर पक्षाला दिली आहे. पक्षाचे नेतृत्व करण्याची संधी नवीन चेहऱ्यांना दिली जावी यासाठी राजीनामा देण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केल्याचे सांगितले आहे. जयंत पाटील यांनी दुसऱ्यांदा राजीनामा देण्याबाबत विधान केल्याने पक्षात खळबळ उडाली आहे. मंगळवारी पक्षाच्या २६ व्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने आयोजित मेळाव्यात ते बोलत होते. जयंत पाटील यांनी केलेल्या मागणीवर शरद पवार यांनी त्यांच्या भाषणातच उत्तर दिले. पवार म्हणाले की, ''जयंत पाटील यांनी दहा वर्षे राज्याचे अर्थमंत्री म्हणून काम केले. विरोधी पक्ष म्हणूनही त्यांनी प्रामाणिकपणे काम केले. नवीन चेहऱ्यांना संधी देण्याच्या पाटील यांच्या मागणीनुसार प्रमुख सहकाऱ्यांशी चर्चा करून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीनंतर निर्णय घेतला जाईल. प्रत्येक जिल्ह्यात आणि तालुक्यात एक नवीन चेहरा पक्षाचे नेतृत्व करेल याची खात्री आम्हाला करायची आहे.''

शरद पवार यांनी बोलताना पाटील यांना त्यांच्या पदावर राहण्याचा आग्रह धरला नाही आणि त्यांच्या नेतृत्वाचे कौतुकही केले नाही.



पवारांनी केलेल्या या वक्तव्यामुळे राष्ट्रवादीच्या (शरद पवार) नेत्यांच्या एका गटाला असे वाटू लागले आहे की, जर पाटील यांनी राजीनामा दिला तर ते पक्षात राहणार नाहीत. ''त्यांच्यासाठी (जयंत पाटील) भाजपाचे दरवाजे खुले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत पाटील यांचे वारंवार केलेले कौतुक हे याचे पुरावे आहेत. ते भाजपा किंवा अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीत सामील होऊ शकतात'', असे राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका नेत्याने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले.

असं असताना शरद पवारांचे जवळचे मानले जाणारे ज्येष्ठ राष्ट्रवादी नेते अंकुश काकडे यांनी दावा केला की, ''तात्काळ नेतृत्वाची कसलीही चिंता नाही.'' ''मला वाटते की येत्या महानगरपालिका निवडणुकीपर्यंत पाटील नेतृत्व करतील'', असेही ते म्हणाले. दरम्यान, पवारांच्या घोषणेमुळे त्यांच्याच पक्षातील माजी मंत्री जितेंद्र आव्हाड, राजेश टोपे आणि शशिकांत शिंदे, लोकसभा खासदार अमोल कोल्हे आणि पवारांचे नातू रोहित पवार यांसारखे तरुण नेते पाटील यांच्या जागी येण्याच्या शर्यतीत असल्याचे दिसून येत आहे.

पदासाठीचे प्रमुख दावेदार

रोहित पवार आणि जयंत पाटील यांच्यातील संबंध तणावग्रस्त आहेत. गेल्या वर्षी जूनमध्ये पक्षाच्या स्थापना दिनाच्या कार्यक्रमात पक्षाच्या कामकाजाशी संबंधित मुद्द्यांवरून पाटील यांना लक्ष्य करणारे रोहित पवार हे पहिले नेते होते. रोहित पवारांनी सार्वजनिकरित्या असे मुद्दे उपस्थित केल्याबद्दल त्यांना फटकारताना पाटील यांनी नंतर प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा देण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यावेळी त्यांनी म्हटले होते की, ते फक्त विधानसभा निवडणुकीपर्यंत या पदावर राहतील. दरम्यान, रोहित यांनी तेव्हा आपला पक्षाचे नेतृत्व करण्याचा कोणताही हेतू नसल्याचे सांगितले आणि त्यानंतर त्यांनी जयंत पाटील यांच्या कामाची प्रशंसाही केली होती.

जयंत पाटील यांच्याविरुद्ध विरोधक फार आक्रमक नसले तरी राजीनाम्यामागे एक प्रमुख कारण असल्याचे सूत्रांनी सांगितले. जयंत पाटील यांनी पद सोडण्याची तयारी दाखवण्यामागील कारण म्हणजे त्यांच्याविरुद्ध अंमलबजावणी संचालनालय (ईडी)कडून दाखल असलेले खटले. आयएफ अँड एफएस घोटाळ्यातील कथित सहभागाबद्दलच्या प्रकरणासंदर्भात २०२३ मध्ये ईडीने पाटील यांना समन्स बजावल्यापासून आयएफ अँड एफएस प्रकरण पुढे सरकलेले नाही. भाजपामधील सूत्रांनी सांगितले की, ''फडणवीस यांच्याशी पाटील यांचे मैत्रीपूर्ण संबंध त्यांच्या फायद्याचे ठरले आहेत.''

दुसरीकडे, जितेंद्र आव्हाड हे शरद पवार तसेच त्यांच्या कन्या बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांचे निकटवर्तीय आहेत. विविध मुद्द्यांवर सत्ताधारी महायुतीला जोरदारपणे तोंड देणारा एक मजबूत आवाज म्हणून आव्हांडाकडे पाहिले जाते. तसंच ओबीसी नेते मस्साजोगचे सरपंच संजय देशमुख यांच्या हत्येवरून माजी मंत्री धनंजय मुंडे आणि त्यांच्या समर्थकांवर केलेल्या हल्ल्यांमुळे मराठा समाजात त्यांनी स्वत:चे स्थान निर्माण केले असल्याचे बोलले जाते.

पाटील यांच्या जागी शशिकांत शिंदे हेदेखील आणखी एक आघाडीचे उमेदवार आहेत. ते सातारा जिल्ह्यातून अनेक वेळा आमदार राहिले आहेत. गेल्या वर्षीच्या निवडणुकीत सातारा लोकसभा मतदारसंघातून भाजपाच्या उदयनराजे भोसले यांच्याकडून त्यांचा पराभव झाला. जालन्याचे रहिवासी असलेले आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकारमध्ये राज्याचे आरोग्य मंत्री म्हणून कोविड-१९ साथीच्या आजाराबाबत त्यांनी केलेल्या कामगिरीबद्दल त्यांचे कौतुक झाले होते.

सुप्रिया सुळे शर्यतीत आहेत का?

सूत्रांनी सांगितले की, जर शरद पवारांनी राजीनामा देण्याचा निर्णय घेतला तरच सुप्रिया सुळे राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रवादी (शरद पवार)ची सूत्रे हाती घेण्यास उत्सुक होत्या. तरीही पक्षातील एका गटाला असे वाटते की, त्यांनी पाटील यांचा पदभार स्वीकारावा. ''पवार साहेब आमचे राष्ट्रीय नेते आहेत आणि सुप्रिया सुळे यांनी पक्षासाठी महत्त्वाचे राज्य असलेल्या महाराष्ट्राची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. त्या एक सक्षम नेत्या आहेत, ज्यांनी आपली क्षमता वेळोवेळी सिद्ध केली आहे. अलीकडेच त्यांनी परदेशात केंद्र सरकारने पाठवलेल्या शिष्टमंडळात देशाचे प्रतिनिधित्वदेखील केले आणि प्रशंसा मिळवली. पंतप्रधान नरेंद्र मोदींनीदेखील त्यांच्यावर विश्वास ठेवला'', असे राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) नेते महेश तपासे यांनी म्हटले.

## आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाची प्रतिमा उंचावली

### पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांची पत्रकार परिषदेत माहिती

**परभणी/प्रतिनिधी :** केंद्रातील मोदी सरकारच्या कार्यकाळाला ११ वर्षे पूर्ण झाली आहेत. या काळात आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाची प्रतिमा उंचावली असून, आत्मनिर्भर भारत ते विकसित भारताकडे जाण्याची ही ११ वर्षे आहेत. अशी माहिती राज्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी दिली.

भाजप महानगरच्या वतीने पत्रकार परिषद घेण्यात आली. याप्रसंगी भाजपा महानगर अध्यक्ष शिवाजी भरोसे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे, प्रदेश प्रवक्ता उमेश देशमुख, विलास बाबर यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना पालकमंत्री सौ. बोर्डीकर यांनी सांगितले की, मागील अकरा वर्षात देशाचा सर्वांगीण विकास झाला असून, देश विकसित होण्याकडे वाटचाल करत असून यशस्वी कार्यकाळाबद्दल संकल्प से सिध्दी तक अभियान राबविल्या जात आहे. या काळात आत्मनिर्भर भारताचे स्वप्न पूर्ण झाले असूनलं पर्यंत विकसित राष्ट्र बनविण्याचे मोदींचे ध्येय आहे. याच काळात मोफत अन्नधान्य, सर्वांना घरे देण्यात आली. प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून ४ कोटी गरजूंना घरे देण्यात आली असून शिल्लक नागरिकांची नोंदणी केली जात. देशात १२रर कोटीपेक्षा अधिक शौचालये बांधण्यात आली आहेत. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत देशाने प्रगती केली आहे. नव्या भारताने स्वतः बनविलेल्या क्षेपणास्त्रासह सर्व आयूधांचा यशस्वी वापर करून, त्याचे प्रात्याक्षिक संपूर्ण जगाला ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पहायला मिळाले. यामुळे सर्वांना भारताची ताकद कळली. दहशतवाद्यांबरोबर नक्षलवादालाही प्रत्युत्तर दिले आहे. भारत जगामध्ये चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला असून, लवकरच तो तिसऱ्या स्थानावर येईल. सामान्य नागरीक, व्यावसायिक, उद्योजक, शेतकरी आणि समाजातील सर्व घटकांना



सामावून घेत काम केले जात आहे. शेती क्षेत्रावर सरकारचे विशेष लक्ष असून बजेटमध्ये मोठी आर्थिक तरतूद करत शेतीच्या विकासासाठी प्रयत्न केले जात आहेत. प्रत्येक जिल्ह्यात मेडिकल कॉलेज सुरू केले असून, युजी व पिजीच्या जागा वाढवल्या आहेत. आरोग्याच्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.अशी माहिती माध्यमांशी बोलताना दिली.

## माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील रोजगारांचे आव्हान

माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील कर्मचारीकपातीच्या बातम्या या आता नित्याच्याच. पण, त्यानिमित्ताने आयटी क्षेत्रात नेमकी ही परिस्थिती का उद्भवते? यामागे केवळ व्यावसायिक आणि आर्थिक संकट हेच कारण आहे की कृत्रिम बुद्धिमत्ताच या क्षेत्राला आव्हान देत आहे? २००० सालाच्या प्रारंभी अभियांत्रिकी, तंत्रज्ञान या विषयांच्याच जोडीला माहिती-तंत्रज्ञान व संगणकशास्त्र विषयातील पदवीधर उमेदवारांना चांगली, मनाजोगती व आकर्षक पगाराची नोकरी सहजगत्या मिळत असे. त्यामुळे या क्षेत्रातील पदवी आणि पदवीधरांना करिअरपासून नोकरीपर्यंत प्राधान्य दिले जाई. मात्र, गेल्या पाच वर्षांत परिस्थितीत मोठे बदल झाले आहेत. या बदलांसाठी सकृतदर्शनी जागतिक मंदी, 'कोरोना'नंतरचे बदलते कामकाज आणि कार्यसंस्कृती, वाढत्या संगणकीकरणासह वाढलेली स्पर्धा, बदलती अर्थव्यवस्था व व्यावसायिक गणित ही प्रमुख कारणे सांगितली जात असतानाच, त्यात भर पडली ती कृत्रिम बुद्धिमतेची. अल्पावधीत, पण मोठ्या प्रमाणात झालेल्या या बदलांचा अभ्यास धक्कादायक व अभ्यास करण्यासारखा ठरतो तो याचमुळे. माहिती-तंत्रज्ञान व संगणक क्षेत्र जेव्हा व्यवसाय-व्यवस्थापन क्षेत्रात विशेष प्रकाशझोतात होते, तेव्हा त्याची व या क्षेत्रातील रोजगारांची सर्वदूर व प्रतिष्ठेसह चर्चा होत असे. अगदी शैक्षणिक अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यापासून करिअर-रोजगार व वैयक्तिक आयुष्यात स्थिरता येण्याच्या दृष्टीने माहिती-तंत्रज्ञान हे अव्वल क्षेत्र समजले जाई. असे होण्यामागची कारण परंपरा म्हणजे, ९० सालच्या दशकासोबत संगणक क्षेत्राला आलेली व्यावसायिक समृद्धी आणि त्याचदरम्यान झालेले जागतिकीकरण व जागतिक पातळीवरील खुली आर्थिक व व्यापार व्यवस्था. या बदलत्या स्थितीचा मोठा फायदा भारतीय संगणक उद्योग व या क्षेत्रातील शिक्षित-प्रशिक्षित उमेदवारांना स्वाभाविकपणे झाला. भारतातील उपलब्ध कौशल्य व संगणकीयतज्ज्ञ आणि उद्योगांची कर्तबगारी यामुळे अमेरिकेसह युरोप व प्रगतिशील देशांनी आपल्या वाढत्या संगणकीय गरजांच्या पूर्ततेसाठी भारताला प्राधान्य देण्यास सुरुवात केली व भारतीयांनी त्याचे चीज केले. याच्या परिणामी भारतातील संगणक क्षेत्रातील रोजगार संधी वाढत गेल्या. नंतरच्या टप्प्यात व विशेषतः 'कोरोना' काळात परिस्थितीने जागतिक स्तरावर वेगळे वळण घेतले. इतर उद्योग-व्यवसाय क्षेत्राप्रमाणेच संगणक क्षेत्रात कामकाज व व्यवसायापासून कर्मचार्यांच्या संख्येपर्यंत मोठीच उलथापालथ झाली. याचाच पहिला व महत्त्वाचा परिणाम म्हणजे, संगणक व माहिती-तंत्रज्ञानाचा आर्थिक व व्यावसायिक प्रभाव कमी होऊ लागला. त्याचा थेट व प्रत्यक्ष परिणाम प्रचलित कर्मचार्यांचा विकास आणि वेतनापासून नव्याने उत्तीर्ण होणार्या कर्मचार्यांची संख्या जवळजवळ नगण्य स्वरूपात होण्यामध्ये झाला. हा बदल पाहणे व पचविणे अर्थातच जड गेले. एवढचे नव्हे, संगणक तंत्रज्ञान क्षेत्रातील सर्वच प्रस्थापित कंपन्यांनी कर्मचार्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात कपात करण्यास सुरुवात केली. परिणामी, पूर्वी माहिती-तंत्रज्ञान व संगणक क्षेत्रात आघाडीवर असणार्या एका प्रस्थापित कंपनीने एकाच दिवसात ५०० पर्यंत कर्मचार्यांची कपात केली, तर नव्या कर्मचार्यांच्या निवडीला अर्थातच थांबविण्यात आले. माहिती-तंत्रज्ञान व संगणकशास्त्र क्षेत्रातील व्यवस्थापन-उद्योजक व कर्मचार्यांनी हे संकट जेमतेम थोपवले. मात्र, व्यावसायिक परिस्थिती यथावत होत असतानाच कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर व अंमलबजावणी सुरू झाली. याने विकसित संगणक तंत्रज्ञानापुढे मोठे आव्हान उभे केले. यामुळे अद्ययावत तंत्रज्ञान व संगणकीय सेवा क्षेत्रातील अनेक प्रकारच्या कामांना बेकाम, तर ही कामे करणार्यांना बेकार केले. हे परिणाम कंपन्यांपासून कर्मचार्यांपर्यंत सर्वच स्तरावर झाले.या परिणामांचे संख्यात्मक स्वरूप सांगायचे म्हणजे, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरामुळे माहिती- तंत्रज्ञान क्षेत्रात २०१८ ते २०२१ या केवळ तीन वर्षांत नव्या कर्मचार्यांची भरती ९५ हजारांनी कमी झाली. त्यानंतरही या संख्येत वाढ होत गेली व २०२३ साली हा आकडा दोन लाख, ५० हजारांवर गेला. यालाच जोड मिळाली ती संगणक क्षेत्रातील कर्मचारी कपातीची. परिणामी आंतरराष्ट्रीय स्तरावर माहिती-तंत्रज्ञान उद्योगात आलेल्या व्यावसायिक व आर्थिक संकटांमुळे माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील विशेषतः नवागत कर्मचार्यांचे पगार व वेतनमान वाढणे तर दूर; पण ते जवळजवळ 'जैसे थे' राहिले आहेत. ही बाब कर्मचारी व उमेदवारांसाठी निश्चितच काळजीची ठरली. कर्मचारी व्यवस्थापन क्षेत्रातील प्रस्थापित कंपनी असणार्या 'टीमलीज'ने माहिती-तंत्रज्ञान व संगणक क्षेत्रातील मानव व्यवस्थापन क्षेत्रात प्रामुख्याने काम करणार्या व्यवस्थापन कंपनीने त्यादरम्यान केलेल्या कर्मचारी सर्वेक्षणानुसार त्यादरम्यान २०१५ साली माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील नव्या उमेदवार कर्मचार्यांचा २०१५ साली असणारे तीन लाख, ५० हजार असणारे वार्षिक सरासरी वेतन २०२४ साली सुमारे तीन लाख, ८० हजार रुपये होते. ही बाब संबंधित कंपन्यांपासून कर्मचार्यांपर्यंत सर्वांसाठीच मोठा काळजीचा विषय ठरला. तसे पाहता, गेल्या सुमारे दोन वर्षांत कृत्रिम बुद्धिमता या नवीन आयामाची चर्चा सुरू झाली. या नवीन तंत्राचा वापर आणि त्याचे माहिती-तंत्रज्ञानासह विविध व्यावसायिक क्षेत्रांवर होणारे परिणाम याची व्यापक चर्चा अद्यापही सुरू आहे. कृत्रिम बुद्धिमता व त्यामुळे माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रावर झालेल्या परिणामांमुळे संगणक तंत्रज्ञान क्षेत्रातील विद्यमान कर्मचार्यांवर नोकरी-रोजगार गमावण्याचे व या क्षेत्रातील नवागतांपुढे नोकरी-रोजगार न मिळण्याचे संकट निर्माण झाल्याचे यानिमित्ताने प्रचलित होत आहे. कृत्रिम बुद्धिमता तंत्रज्ञानाचा व्यावसायिक वापर व त्याचे प्रचलित कर्मचार्यांचे रोजगार व नव्या कर्मचार्यांच्या रोजगाराच्या संधी हे आव्हानात्मक मुद्दे महत्त्वाचे असले, तरी त्यामुळे माहिती-तंत्रज्ञान क्षेत्र व तेथील कर्मचारी यांनी निराशेतून आपण सर्वस्व गमावले वा गमवावे लागणार, अशी नकारात्मक भावना घेण्याचे मुळीच कारण नाही. याचे महत्त्वाचे व प्रमुख कारण म्हणजे, संगणकशास्त्र व माहिती-तंत्रज्ञान या व्यवसाय क्षेत्राला संपूर्ण व समर्थपणे पर्याय बनण्याची क्षमता कृत्रिम बुद्धिमत्ता विषयात उपलब्ध झाली नाही व तसे १०० टक्के होण्याची क्षमता पण नाही. माहिती-तंत्रज्ञानातील प्रकल्प व्यवस्थापनापासून विशेष तांत्रिक स्वरूपाचे काम, तांत्रिक मुद्द्यांची सोडवणूक यांसारखी मोठी व महत्त्वाची कामे संगणकशास्त्र विषयाशी संबंधित राहणार आहेत.

पान १ वरून...

### २४२ प्रवाशांचा...

चित्रात विमानाचा एक पंख तुटून पडला असल्याचे दिसून येत आहे. अग्निशमन दलाचे जवान पाणी फवारून आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करत आहेत. सध्या आग काही प्रमाणात आटोक्यात आली आहे. ही दुर्घटना घडली तेव्हा विमान विमानतळावरून उड्डाण घेत होते. विमानाचे बहुतेक भाग जळून राख झाले आहेत. ज्या इमारतीवर विमान पडले त्या इमारतीचेही नुकसान झाले आहे. विमानतळाजवळ एक सिव्हिल हॉस्पिटल आहे, जिथे सर्व डॉक्टरांच्या रजा रद्द करण्यात आल्या आहेत. आतापर्यंत मिळालेल्या माहितीनुसार, अहमदाबादहून उड्डाण केलेले हे विमान लंडनच्या दिशेने जात होते.

विमानात क्रू मेंबर्ससह २४२ लोक होते. अहमदाबाद पोलिस नियंत्रण कक्षाने याची पुष्टी केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हे विमान अहमदाबादहून लंडनला जात होते आणि अहमदाबाद विमानतळावरून उड्डाण घेतल्यानंतर काही वेळातच मेघानीनगरजवळ अपघात झाला. विमानतळापासून मेघानीनगरचे अंतर सुमारे १५ किलोमीटर आहे. अपघातानंतर लगेचच अग्निशमन दलाच्या ७ गाड्या घटनास्थळी पोहोचल्या आणि आग विझवण्यास सुरुवात केली.

विमान अपघाताचे अनेक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत, ज्यामध्ये अपघातस्थळावरून आकाशात काळा धूर उठताना दिसत आहे. घटनास्थळी आपत्कालीन प्रतिसाद पथक तैनात करण्यात आले आहे. अधिकाऱ्यांनी अद्याप अपघाताचे कारण निश्रिचत केलेले नाही. मेघानीनगर परिसरातील धारपूरमधून प्रचंड धूर दिसत आहे.

### १५ डॉक्टर जखमी,

भागात कोसळले. विमान कोसळल्यामुळे मेघानी नगरमध्ये अनेक इमारतींचे नुकसान झाले आहे. हा भाग दाट लोकवस्तीचा होता. त्यामुळे विमानातील प्रवाशांसोबत मेघानी नगरमधील नागरिकांचाही मृत्यू झाल्याची शक्यता वर्तविली जात आहे. हे विमान खाली कोसळण्यापूर्वी हवेत तब्बल ६२५ फुटांवरुन उड्डाण करत होते. त्यानंतर विमानात काहीतरी तांत्रिक बिघाड झाला असावा. या विमानाचे वैमानिक सुमीत सभरवाल यांनी हवाई नियंत्रण कक्षाला आपातकालीन कॉल केला होता. मात्र, मदत करण्यापूर्वीच हे विमान मेघानी नगरमध्ये कोसळले. मेघानी नगरमध्ये अनेक इमारती आहेत. त्यापैकी एका रुग्णालयाच्या इमारतीवर हे विमान कोसळले. यामध्ये रुग्णालयाचा टीबी विभाग पूर्णपणे उद्धस्त झाला आहे. तसेच रुग्णालयातील १५ डॉक्टर आणि काही रुग्ण जखमी झाले आहेत. सध्या मेघानी नगरचा संपूर्ण भाग सील करण्यात आला आहे. याठिकाणी केवळ अग्निशामन दल, एनडीआरएफ आणि बचावकार्य करणाऱ्या पथकांना प्रवेश आहे. विमान पडलेल्या भागातून इमारतींमध्ये असलेल्या नागरिकांनाही सुरक्षितस्थळी हलवले जात आहे. विमान कोसळल्यानंतर प्रचंड मोठा स्फोट झाला होता. या हादऱ्यांनी मेघानी नगरमधील इमारतींना तडे गेले आहेत.

अहमदाबादवरुन लंडनला जाणाऱ्या या विमानात २३० प्रवासी आणि १२ क्रू मेंबर होते. यामध्ये १६९ भारतीय, ५३ ब्रिटीश आणि कॅनडाच्या एका नागरिकाचा समावेश आहे. या विमानाने नुकतेच उड्डाण केल्यामुळे विमानाची इंधन टाकी पूर्णपणे भरली होती. या टाकीमध्ये जवळपास सव्वा लाख लीटर इंधन होते. त्यामुळे विमान कोसळताच प्रचंड मोठा स्फोट झाला.

### अहमदाबाद एअरपोर्ट पुढील

सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रवक्त्यांनी सांगितले की, अहमदाबादहून लंडन गॅटविकला जाणारे विमान एआय १७१ आज सकाळी उड्डाणानंतर काही वेळातच विमानतळाबाहेर कोसळले. त्यानंतर, सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळ, अहमदाबाद पुढील सूचना मिळेपर्यंत सर्व उड्डाणे तात्पुरती स्थगित करण्यात आली आहेत. प्रवाशांना विमानतळावर जाण्यापूर्वी नवीनतम अपडेटसाठी त्यांच्या संबंधित एअरलाइन्सशी संपर्क साधण्याचा सल्ला देण्यात येत आहे.

युद्धपातळीवर बचाव कार्य सुरू

अहमदाबाद मध्ये दाटी-वाटीचा परिसर असणाऱ्या भागात एअर इंडियाचा प्रवासी विमान क्रश झाल्यानंतर युद्ध पातळीवर बचाव कार्य सुरू करण्याचे निर्देश गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी प्रशासनाला दिले आहेत .जखमी प्रवाशांना त्वरित उपचार देण्यास सांगण्यात आले आहे .

अहमदाबादमधील एअर इंडिया विमान अपघाताच्या ठिकाणी बचाव आणि मदत कार्य सुरू आहे .जखमी प्रवाशांना उपचारासाठी रुग्णालयात नेण्याची तयारी सुरू असून जखमी किंवा मृतांना नेण्यासाठी ग्रीन कॉरिडॉर तयार केला जात आहे .गांधीनगर होऊन राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या ९० कर्मचाऱ्यांच्या तीन तुकड्या विमान अपघात स्थळी पाठवण्यात आले आहेत .वडोदराहून आणखी तीन तुकड्या पाठवण्यात येत आहेत .

### विमानात काढलेला तो सेल्फी

अखेरच्या सेल्फीमागे काय गोष्ट दडली आहे?

डॉ. कोमी व्यास या उदयपूर येथील रुग्णालयात डॉक्टर म्हणून कार्यरत होत्या. त्यांनी त्यांची नोकरी सोडली आणि त्यांनी लंडन येथे त्यांच्या पतीसह प्रॅक्टिस करायचं ठरवलं. त्यांचे पती प्रतीक जोशी यांनीच पत्नी कोमी आणि तीन मुलांसह हा सेल्फी काढला. विमान प्रवास सुरु होताना काढलेला हा सेल्फी आपल्या कुटुंबाचा अखेरचा सेल्फी ठरणार हे कुठे डॉक्टर प्रतीक जोशींना माहीत होतं? पण घडलं तेच. अहमदाबादहून विमानाने उड्डाण केलं आणि त्यानंतर काही मिनिटांतच विमान कोसळलं. या सेल्फीमध्ये डॉ. प्रतीक आणि त्यांची पत्नी कोमी शेजारी बसले आहेत. तर त्यांच्या मागे जी तीन मुलं दिसत आहेत ती या डॉक्टर दाम्पत्याची मुलं आहेत. विमान अपघातात यांच्या पैकी कुणीही वाचलं नाही.

### मृतांच्या नातेवाईकांना टाटा ग्रुपकडून

जखमी आहेत, त्यांच्याबद्दल संवेदना व्यक्त करून ते लवकर बरे व्हावेत, अशी प्रार्थना करतो.

अपघातामध्ये मृत्यू झालेल्या कुटुंबियांना टाटा ग्रुपने एक कोटींची भरपाई देण्याचे जाहीर केले आहे. तसेच अपघातामुळे जे जखमी झाले आहेत, त्यांच्या वैद्यकीय उपचारांचा सर्व खर्च टाटाकडून केला जाणार आहे. तसेच त्यांच्या प्रकृतीमध्ये सुधारणा व्हावी, यासाठी सर्वतोपरी मदत केली जाणार असल्याचेही एन. चंद्रशेखरन यांनी जाहीर केले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# मंत्री संजय शिरसाट यांनी कोट्यवधीच्या जमिनी स्वस्तात घेतल्या

## विरोधी पक्षनेते अंबादास दानवे व माजी खा. इम्तियाज जलील यांचा पत्रकार परिषदेत आरोप

दैनिक आपला विदर्भ





**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** समाज कल्याण मंत्री संजय शिरसाट यांनी कोट्यवधीच्या जमिनी स्वस्तात घेतल्याचा आरोप एमआयएम प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांनी केला. तर सदरील सर्व भूखंडाचे दस्तावेज विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे यांना दिले. त्यावर राज्यपाल यांना या प्रकरणाची माहिती देणार आहे. तर, अधिवेशनात देखील चर्चा करणार असल्याचा इशारा विरोधी पक्ष नेते दानवे यांनी दिला.

विरोधी पक्षनेते अंबादास दानवे व माजी खासदार इम्तियाज जलील यांची पत्रकार परिषद त्याचबरोबर शिरसाट वापरत असलेली एक गाडी दुबई येथून आणलेली आहे, मात्र ती त्यांच्या नावावर नाही. त्यांच्याकडे जी गाडी त्यांनी नावावर दाखवली. ती सोडून असलेल्या इतर गाड्या आल्या कुठून असा प्रश्न जलील यांनी उपस्थित केला. मात्र जलील यांच्या आरोपांचे काही होणार नाही, असं म्हणत संजय शिरसाट यांनी बोलणे टाळले आहे. मंत्री संजय शिरसाट यांनी गेल्या काही वर्षात अनेक भूखंड विकत घेतले असून, बाजार मूल्यापेक्षा कमी दरात व्यवहार करण्यात आले असल्याचा आरोप एमआयएम प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांनी केले आहे. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांना जलील यांची पुरावे देण्यासाठी भेट घेतली.

मंत्री संजय शिरसाठ यांच्या मुलाच्या नावे अवैध भुखंड खरेदी केल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांना अनेक वर्षांपासून पाहतो, ते अन्यायाच्या विरोधात काम करतात. असाच मुद्दा जिल्ह्याच्या आणि पालकमंत्री यांच्या संदर्भात असते. तेव्हा त्यांना वाटत की, कारवाई होऊ शकत नाही. मात्र मागील हॉटेल प्रकरणात मुख्यमंत्री यांनी चौकशी लावायला हवी होती. अधिकाऱ्यांनी नियम बाजूला ठेवून संजय शिरसाठ यांच्या मुलाच्या नावे केली. जिल्हाधिकारावर दबाव टाकण्यात आला होता. मागील तीन ते चार महिन्यात त्यांनी जी संपत्ती घेतली होती यावरून असे समजते की, खोके संपले असतील, मात्र अद्याप जमा करण्याचे काम सुरू असल्याचं दिसून येत असल्याची टीका इम्तियाज जलील यांनी केली.

इम्तियाज जलील यांनी शिरसाट यांच्या संबंधित सर्व कागदपत्र दिले असून, हे राज्यपाला यांना भेटून दाखवणार असल्याचे अंबादास दानवे यांनी सांगितले. त्यांनी मला संजय शिरसाठ यांच्या वेगवेगळ्या ज्या मालमत्ता आहेत त्याचे कागदपत्र दिले. संजय शिरसाठ यांनी जी मालमत्ता घेतली, त्यात त्यांचा मुलगा आणि पत्नी यांचे नावे आहे. त्याची किंमत ५० कोटी असताना फक्त या ५ कोटी रुपयांत मिळाल्या. प्रशासनावर राजकीय शक्तीचा वापर केला, असा आरोप विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे यांनी केला. ते ७२ व्या मजल्यावर राहतात, कुत्र्यासाठी रूम आहेत. मग हे आज ही म्हणता की, मी रिक्षा चालक आहे. मग हे आले कुठून ? राज्य सरकार आणि राज्यपाल यांच्याकडे हे मुद्दे मांडावे लागतील. राज्यातील पैसे ओरबाडून खाण्याचे काम सुरू आहे. असा आरोप देखील दानवे यांनी माध्यमांशी बोलताना केला.

## संक्षिप्त...

### पदाधिकाऱ्यांशी चर्चा करुन पक्ष प्रमुखांना माहिती देणार - शिवसेना नेते अनिल परब



दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** निवडणुका आल्या की, कार्यकर्त्यांत उत्साह असतो. तो उत्साह इकडे दिसत आहे. निवडणुकांचे वेगवेगळे टप्पे असतात. सध्या आम्ही पहिल्या टप्प्यावर आहोत. हळूहळू पुढील टप्प्याकडे सरकू. आज पदाधिकारी मेळावा आहे. येणाऱ्या महापालिका निवडणुकांची तयारीची माहिती घेण्यासाठी आलो. पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून पक्ष प्रमुखांना माहिती देणार असल्याचे शिवसेना नेते अनिल परब यांनी सांगितले.

### अहमदाबाद विमान दुर्घटनेतील को पायलेट सुमित सबरवाल यांच्या निधनामुळे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** अहमदाबाद विमान दुर्घटनेतील को पायलेट सुमित सबरवाल यांच्या कुटुंबीयांवर त्यांच्या निधनामुळे दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मुंबईतील पवई परिसरामध्ये सुमित सबरवाल याचे ८८ वर्षांचे वडील एकटेच राहतात. टेकऑफ करण्यापूर्वी सुमितने त्यांच्याशी संवाद साधला होता. लंडनमध्ये विमान लँड झाल्यावर मी पुन्हा बोलेन, असं त्यांनी सांगितलं होतं. पण त्या आधीच त्यांचा वर काळाने घाला घातला. सुमित याच्या पाश्चात त्याची बहीण आणि दोन भाचे असा परिवार आहे. त्याच्या बहिणीला त्याच्या बहिणीला ही माहिती मिळतच, ती दिल्लीहून सुमितच्या मुंबईला परतते आहे. काही वेळापूर्वी आमदार दिलीप लांडे यांनी भेट घेतली, आणि त्यांचे सांत्वन केलं.

### छत्रपती संभाजीनगर शहरासह जिल्हाभरामध्ये मुसळधार पावसाला सुरुवात

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यामध्ये गेल्या पंधरा दिवसापासून पाऊस झाला नसल्याने उकाड्यामुळे नागरिक हैराण झाले होते. ३७ ते ४० तापमान राहत असून, शेतकरी राजा पावसाच्या प्रतीक्षेत होता. ७ तारीख निघुन गेली खरिपाच्या पेरण्या शेतकऱ्यांनी केल्या नाही. ८ दिवसांपासून शेतकरी हा मोठा पावसाच्या प्रतीक्षेत होता. तरी पाऊस पडला नाही, आज मात्र मुसळधार पावसाला सायंकाळी सुरुवात झाली. आणि वातावरणामध्ये गारवा निर्माण झाला. यामध्ये वादळी वाऱ्यासह जोराचा पाऊस सुरू झाला मुसळधार पाऊस झाल्यामुळे नदीनाले वाहू लागले.

### सोमवारी (१६ जुन) महिला लोकशाही दिन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येतो. त्याअनुषंगाने जून महिन्याचा महिला लोकशाही दिन सोमवार, दि. १६ जून २०२५ रोजी सकाळी ११ वाजता निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात घेण्यात येणार आहे, असे महिला व बालविकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी कळविले आहे.

### कार दुभाजकला धडकल्यानं झाशी जिल्ह्यात भीषण अपघात, महाराष्ट्रातील तिघांचा मृत्यू

झाशी (लखनौ) : उत्तर प्रदेशातील पूंछ पोलीस स्टेशन परिसरात झाशी-कानपूर राष्ट्रीय महामार्गावर गुरुवारी पहाटे ४ वाजताच्या सुमारास भीषण रस्ते अपघात झाला. या अपघातात आई आणि मुलीसह चालकाचा मृत्यू झाला. तर ५ जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार झाशीतील सिद्धार्थनगरच्या इत्री बाजार येथील ४५ वर्षीय उवेदुर रहमान हे महाराष्ट्रात आपल्या कुटुंबासह राहतात. सिद्धार्थनगरमधील एका लग्न समारंभात सहभागी होण्यासाठी ते आले होते. वडील, पत्नी आणि ४ मुलांसह कारनं महाराष्ट्रात परतत असताना त्यांच्या कारचा अपघात झाला. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी जखमींना झाशी मेडिकल कॉलेजमध्ये दाखल केले. त्यापैकी २ जणांची प्रकृती गंभीर आहे.


कार दुभाजकाला धडकली- झाशी- कानपूर महामार्गावरील पूंछ पोलीस स्टेशन परिसरातील खिड़ी येथे अचानक कार दुभाजकाला धडकली. अपघात इतका भीषण होता की उवेदुर रहमान यांची पत्नी

## बेवफा सोनमनंतर आता आणखी एक थरकाप उडवणारा प्रेमाचा त्रिकोण समोर! गिफ्ट देण्याच्या बहाण्यानं गर्लफ्रेंडनं बॉयफ्रेंडला घरी बोलावलं अन्..

**आगरतळा :** बेवफा सोनम रघुवंशीच्या थरकापाने अवघा देश हादरला असतानाच आता आणखी एक लव्ह ट्रँगल समोर आला आहे. त्रिपुराची राजधानी आगरतळापासून १२० किमी अंतरावर असलेल्या गंडाचेरा बाजारात एका तरुणाचा मृतदेह आइस्क्रीम फ्रीजरमधून ट्रॉली बॅगमध्ये आढळल्याने खळबळ उडाली. मृताची ओळख २८ वर्षीय सरीफुल इस्लाम अशी झाली आहे, जो स्मार्ट सिटी मिशन प्रकल्पाशी संबंधित इलेक्ट्रिशियन होता. ८ जून रोजी संध्याकाळी झालेल्या एका घटनेतून ही हत्या उघडकीस आली, ज्यामध्ये नवनीता दासने भेटवस्तू देण्याच्या बहाण्याने सरीफुलला घरी बोलावले होते. डॉक्टर दिबाकर साहा आणि त्यांच्या दोन साथीदारांनी कटाचा भाग म्हणून सरीफुलची गळा दाबून हत्या केली. सरीफुलची प्रथम गळा दाबून हत्या करण्यात आली. त्यानंतर त्याचा मृतदेह लपवण्यासाठी ट्रॉली बॅगचा वापर करण्यात आला. हत्येच्या दुसऱ्या दिवशी दिबाकरचे पालक दीपक साहा आणि देबिका साहा आगरतळाहून गंडाचेरा येथे आले आणि त्यांनी मृतदेह दुकानाच्या फ्रीजरमध्ये लपवून ठेवला.

त्रिपुरा पोलिसांचे वरिष्ठ अधिकारी किरण कुमार म्हणाले की, पोलिसांनी डिजिटल चॅट्स, कॉल रेकॉर्ड्स आणि जीपीएस लोकेशनवरून सर्व आरोपींची भूमिका स्पष्ट केली. हत्येमागे प्रेमाचा त्रिकोण आणि कौटुंबिक दबाव यासारख्या खोल सामाजिक गुंतागुंती आढळल्या. दिबाकरचे पालक आणि घटनेशी संबंधित तीन मुख्य आरोपींसह एका महिलेला अटक करण्यात आली आहे.

## वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसामुळे अनेक घरांवर भले मोठे झाडे पडून घरांचे नुकसान



**जळगाव/प्रतिनिधी :** पाचोरा तालुक्यातील खडकदेवळा खुर्द येथील रात्री झालेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसामुळे अनेक घरांचे पत्रे उडाले आहेत. तर काही घरांवर भले मोठे झाडे पडून घरांचे नुकसान झाले आहे. घरांवर वादळी वाऱ्यामुळे झाडे कोसळल्याने बालंबाल वाचवले आहे. सदर अवकाळी पावसामुळे झालेल्या घरांचे नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## ऑपरेशन सिंदूर हे कम्प्यूटर गेमप्रमाणे

### नाना पटोलेंच्या वक्तव्यामुळे नवा वाद



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** काँग्रेसचे नेते व आमदार नाना पटोले यांनी भारतीय लष्कराने पाकिस्तानमधील दहशतवाद्यांचा नायनाट करण्यासाठी राबवलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' या मोहिमेबाबत केलेल्या एका वक्तव्यामुळे नव्या वादाला तोंड फुटलं आहे. ''ऑपरेशन सिंदूर म्हणजे लहान मुलांचा संगणकावरील व्हिडीओ गेम होता'', असं पटोले यांनी म्हटलं आहे. ''भारताने हल्ल्याआधीच पाकिस्तानला पूर्वकल्पना दिल्याने पाकिस्तानने आपली माणसं तिथून (जिथे हल्ला केला जाणार होता ती ठिकाणे) हटवली. तसेच अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्यापारावरून धमकी दिल्यानंतर केंद्र सरकारने ऑपरेशन सिंदूर थांबवलं'', असंही पटोले यांनी म्हटलं आहे.

नाना पटोले म्हणाले, ''अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एक-दोनदा नव्हे तर डझनभर वेळा सांगितलं आहे की आम्ही दोन्ही देशांना धमकावलं की तुम्ही युद्ध बंद करा अन्यथा आम्ही तुमच्याबरोबरचा व्यापार बंद करू. ट्रम्प यांच्या इशाऱ्यानंतर ऑपरेशन सिंदूर थांबवण्यात आलं.

काँग्रेस आमदार म्हणाले, ''भारताच्या परराष्ट्रमंत्र्यांनी ऑपरेशन सिंदूरसंदर्भात एक वक्तव्य केलं आहे. त्यावरून एक गोष्ट स्पष्ट झाली आहे की भारताने आधी पाकिस्तानला सांगितलं होतं की आम्ही अमुक ठिकाणी लक्ष्य करणार आहोत. तुम्ही तुमच्या लोकांना तिथून हटवा. याचा अर्थ असा की लहान मुलं कॉम्प्युटरवर गेम खेळतात तसा गेम खेळवण्यात आला होता''.

दरम्यान, पटोले यांच्या या वक्तव्यावरून राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी संताप व्यक्त केला आहे. त्यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की ''ऑपरेशन सिंदूर म्हणजे कॉम्प्युटर गेम आहे' असं संतापजनक वक्तव्य काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी केलं आणि काँग्रेस का हात पाकिस्तान के साथ हे पुन्हा एकदा सिद्ध झालं. भारताच्या शत्रूंच्या मनात भीती निर्माण करणाऱ्या या मोहिमेचे हेटाळणी करणं म्हणजे फक्त वीर जवानांचा आणि त्यांच्या शौर्याचा अपमान नाहीतर संपूर्ण भारतीयांचा अपमान आहे. नाना पटोले यांच्या या बाष्कळ वक्तव्यामुळे शहीद जवानांच्या कुटुंबियांना किती वेदना होणार आहेत, याची कल्पना या संवेदनाहीन माणसाला आहे की नाही?''

बावनकुळे पटोलेंना उद्देशून म्हणाले, नाना, ऑपरेशन सिंदूर म्हणजे कॉम्प्युटर गेम नाही तर पाकिस्तानी दहशतवाद्यांच्या अड्ड्यावर केलेली धाडसी आणि शौर्याची कारवाई आहे. ही देशद्रोह्यांच्या छातीत धडकी भरवणारी जाज्वल्य शौर्यगाथा आहे! देशाच्या जवानांचं शौर्य, दहशतवादविरोधातील कारवाई आणि भारत मातेच्या रक्षणासाठीचा लढा काँग्रेसला खेळ वाटतो? तुमचे नेते राहुल गांधी देखील परदेशात जाऊन भारताचा अवमान करतात. 'सर्जिकल स्ट्राइक'चाही पुरावा मागण्याची नीच मानसिकता काँग्रेसनं दाखवली. पण देश उघड्या डोळ्यांनी पाहतोय की कोण वीरांच्या बाजूला आहे आणि कोण पाकिस्तानच्या! नाना, तुमच्या या देशद्रोही मानसिकतेला देश कधीच माफ करणार नाही. तुमचं मन व मेंदू भ्रष्ट झाला आहे. मी तुमच्या नीच मानसिकतेचा कडाडून निषेध करीत आहे''.

## शेतकऱ्यांच्या समस्या निकाली काढण्यासाठी आमदार खरात यांची सरपंच व सचिवांना भावनिक साद; बोलकी पत्र लिहून समस्या निकाली काढण्याच्या सूचना

दैनिक आपला विदर्भ



**मेहकर/प्रतिनिधी :** क्रांती तलवारीने नव्हे, तर चांगल्या विचारांनी आणि दृढ निश्चयाने घडते, या विचारांना अनुसरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी मेहकर-लोणार मतदारसंघाच्या विकासाचा ध्यास घेतला आहे. आमदार म्हणून निवडून आल्यापासून त्यांनी शेतकरी समाज उन्नतीचा सकारात्मक मार्ग स्वीकारत शासन- प्रशासन, अधिकारी आणि जनतेशी थेट संवाद साधून कामाचा झपाटा वाढवला आहे. तर शेतकऱ्यांच्या समस्या निकाली काढण्यासाठी आमदार सिद्धार्थ खरात यांनी सरपंच सुविधांना पत्राद्वारे भावनिक साद घालून प्रश्न तात्काळ निकाली काढण्याच्या सूचना केल्या आहेत.

गेल्या सहा महिन्यांमध्ये रखडलेली कामे मार्गी लावताना, शेतकऱ्यांच्या दृष्टीने विकासाची वाट असलेल्या गावांच्या शेत रस्ते, पांदण रस्ते आणि गावजोड रस्त्यांच्या समस्यांवर आमदार खरात यांनी लक्ष केंद्रित केले आहे. या संदर्भात नुकत्याच आयोजित संयुक्त बैठकीत महसूल अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि शेतकरी यांच्यासमवेत चर्चा करत समस्यांचा आढावा घेतला व शेत रस्ते, पांदण रस्ते व गावजोड रस्ते करण्यासाठी ग्राम पंचायत व प्रशासनाला रोडमॅप दिला आहे. बैठकीत दिलेल्या सूचना प्रत्यक्ष या साठी त्यांनी मेहकर व लोणार तालुक्यातील सर्व सरपंच व ग्रामसेवक यांना पत्र लिहीले आहे.सदर पत्रात मेहकर व लोणार तालुक्यांत या योजनेअंतर्गत शेतरस्ते, पांदण रस्ते व गावजोड रस्त्यांची कामे अपेक्षेप्रमाणे झालेली नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे शेतरस्त्यांचे मजबुतीकरण करणी,अतिक्रमणमुक्त करून कच्चा व पक्का रस्ता विकसित करावा, अडथळा असलेले रस्ते खुले करून नव्याने कच्च्या रस्त्यांची निर्मिती करावी, अनेक वर्षांपासून ही कामे प्रलंबित असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढली आहे. मातोश्री ग्रामसमृद्धी योजना अंतर्गत केंद्र व राज्य रोहयो मधून यासाठी निधी उपलब्ध असून, आपण व आपल्या ग्रामपंचायतीने या संधीचा योग्य लाभ घ्यावा, तरी, आपण पुढील आठ दिवसात आपल्या गावातील गरजेच्या शेतरस्ते, पांदण रस्ते व गावजोड रस्त्यांबाबत ग्रामपंचायतीच्या बैठकीत ठराव करावा व त्यानुसार पूरक आराखडा तयार करून तो तहसीलदार (तालुका समिती अध्यक्ष) यांच्याकडे सादर करावा. या आराखड्याची एक प्रत कृपया माझ्या आमदार कार्यालयातही जमा करावी, ग्रामपंचायत पातळीवर ही प्रक्रिया पूर्ण केल्यास, शासनस्तरावर या मागण्या प्रभावीपणे मांडून संबंधित कामे मार्गी लावण्यासाठी मला पाठपुरावा करणे सुलभ होईल. त्यामुळे शेतकऱ्यांना सहकार्य करून त्यांच्या समस्या तात्काळ निकाली काढाव्या अशी भावनिक साथ सिद्धार्थ खरात यांनी मतदारसंघातील सरपंच यांना पत्राद्वारे घातली आहे.

# योगाच्या सामर्थ्याने जागतिक आरोग्य आणि शांततेच्या दिशेने भारताचे नेतृत्व!

## केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी केली आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्य केली कार्यक्रमांची घोषणा

दैनिक आपला विदर्भ





**बुलढाणा/प्रतिनिधी :** योगाच्या सामार्थ्याने जागतिक आरोग्य आणि शांततेच्या दिशेने भारताचे नेतृत्व अधिक सक्षम होत असल्याचे प्रतिपादन केंद्रीय आयुष मंत्री (स्वतंत्र प्रभार) प्रतापराव जाधव यांनी आज ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिन (IDY) २०२५ च्या कर्टेन रेज़र (curtain raiser) कार्यक्रमात केले.

केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रीय मीडिया केंद्र येथे प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी, मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी आणि निमंत्रित पाहुण्यांनाच्या समक्ष कर्टेन रेज़र (curtain raiser ) हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी केद्रीयमंत्री प्रतापराव जाधव बोलत होते.

यावर्षीचा आंतरराष्ट्रीय योग दिन विशेष महत्त्वाचा आहे, असे सांगून श्री जाधव म्हणाले, हे वर्ष जागतिक उपक्रमाच्या यशस्वी दशकपूर्तीचे प्रतीक आहे. यावर्षीची संकल्पना ''एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग'' अशी आहे. याबाबतची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ३० मार्च रोजी मन की बात कार्यक्रमात केली होती, अशी माहिती श्री जाधव यांनी यावेळी दिली. ही संकल्पना केवळ वैयक्तिक आरोग्यापुरती मर्यादित नसून, जागतिक समन्वय आणि शांततेसाठी योगाची क्षमता अधोरेखित करते, असे श्री जाधव यांनी यावेळी म्हणाले.

यावर्षी दि. २१ जून २०२५ रोजी मुख्य कार्यक्रम आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथे पार पडणार असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी योग प्रदर्शनाचे नेतृत्व करणार आहेत. आंध्र प्रदेश सरकारने दहा लाख नियमित योग साधकांचे नेटवर्क उभे करण्याचे निश्चित केले असल्याची श्री जाधव यांनी यावेळी सांगीतले आंतरराष्ट्रीय योग दिन २०२५ अंतर्गत आयुष मंत्रालयाने १० महत्वपूर्ण उपक्रम प्रोत्साहित केले आहेत यात योग बंधनः १० देशांसोबत भागीदारीत संयुक्त कार्यक्रम , योग कनेक्टः जागतिक योग परिषद, हरित योगः पर्यावरण संतुलनासाठी वृक्षारोपण मोहिम, योग अनप्लग्डः तरुणाईसाठी प्रेरणादायी उपक्रम, योग समावेशः दिव्यांग आणि विशेष गटांसाठी योगाचे समावेशक कार्यक्रम, योग प्रभावः योगाचे सामाजिक परिणाम मोजणारा अभ्यास, योग महाकुंभ, संयोग व योग पार्क्सः एकत्रित सहभागासाठी १,००० योग उद्यानांची योजना असे लोकोपयोगी तसेच प्रेरणादायी उपक्रम हाती घेतले असल्याचे श्री जाधव यांनी यावेळी सांगितले.


योग दिनाच्या पूर्वसंध्येला नाशिकसह दिल्ली, भुवनेश्वर, व पुडुचेरीसारख्या ठिकाणीही अनेक काउंटडाउन कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहेत. ज्यामध्ये नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

श्री जाधव यांनी यावेळी प्रसारमाध्यमांना आवाहन केले की त्यांनी यावर्षीच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाला ऐतिहासिक व प्रेरणादायी बनवण्यासाठी सरकारला साथ द्यावी. त्यांनी नमूद केले की, ''योग ही केवळ शारीरिक क्रिया नसून, तो शिस्त, संयम आणि सकारात्मकतेचा संदेश देणारी जीवनशैली आहे.'' कार्यक्रमाच्या शेवटी श्री जाधव यांनी आशा व्यक्त केली की, सर्वाच्या सहभागातून आंतरराष्ट्रीय योग दिन २०२५ हा एक केवळ कार्यक्रम न राहता एक जागतिक जनआंदोलन बनेल, जे लोकांना आयुष्यभर योग अंगीकारण्याची प्रेरणा देईल. असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला

# शिवसैनिक अमोल बोरे जनतेच्या मदतीला आले धाऊन



दैनिक आपला विदर्भ



**मेहकर/प्रतिनिधी :** मुसळधार पाऊस व वादळी वाऱ्याने अनेक ठिकाणी रस्त्यावर मोठ मोठे झाडे कोलमडून पडले. त्यामुळे विस्कळीत झालेली वाहत व वाहनधारकांची उडालेली तारांबळ पाहता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे बोरी सर्कल प्रमुख अमोल बोरे यांनी तात्काळ घटना स्थळी जाऊन विस्कळीत झालेली वाहतूक सुरळीत केली. त्यामुळे शिवसैनिक अमोल बोरे मदतीला आले धावून, अशी चर्चा परिसरात होतांना दिसून आली. दीर्घ काळाच्या विश्रांतीनंतर पावसाने तालुक्यात जोरदार हजेरी लावली.मुसळधार पाऊस वादळी वारा वाऱ्याने अनेक मार्गावरील झाडे रस्त्यावर कोलमडून पडली.त्याचबरोबर अनेकांच्या घरावरची टिनपत्रे उडाली.वादळी वाऱ्याने तालुक्यात एकच तारांबळ उडाली. रस्त्या रस्त्यावर अनेक मोठमोठे वृक्ष कोलमडून पडले, त्यामुळे वाहतूक विस्कळीत झाली. या घटनेची माहिती शिवसैनिक अमोल बोरे यांना मिळताच त्यांनी तात्काळ रस्त्यावरील पडलेले वृक्ष बाजूला करून येणारे जाणारे वाहन सुरक्षित घरी जावे त्या साठी प्रत्यक्ष मदत केली.अनेक अडकलेले वाहने त्यांनी काढून दिले, रस्त्यावर पडलेले झाडे बाजूने काढण्याचे काम सुरू केले. आपत्ती व्यवस्थापन विभाग जेंव्हा मदतीला येईल तेंव्हा येईल पण शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अमोल बोरे प्रत्यक्ष काम करत लोकांना मदत केली.या शिवसैनिकाचे मेहकर लोणार मतदार संघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी कौतुक केले आहे.

# पाणी टंचाई निवारणार्थ सिंदखेडराजा तालुक्यातील नागझरी गावासाठी टँकर मंजूर

**बुलढाणा/प्रतिनिधी :** पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता सिंदखेडराजा तालुक्यातील नागझरी गावासाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. आदेशात ठरवून दिल्याप्रमाणे नियमित टँकरव्दारे पाणी पुरवठा केल्या जाणार आहे, अशी माहिती सिंदखेडराजा उपविभागीय अधिकारी यांनी दिली.

नागझरी येथे १ हजार १८ लोकसंख्येसाठी एक टँकरद्वारे १६ हजार ३६० लिटर्स पाणी पुरवठा दररोज करणार आहेत. पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. टँकरने केलेल्या खेपांची ग्रामपंचायतीला नोंद घेण्यात यावी. नोंदवहीची तपासणी नियमितपणे गटविकास अधिकारी यांनी करावी. निवीदाधारकाने टँकर नादुरूस्त झाल्यास त्वरित दुसरे टँकर उपलब्ध करून द्यावे, असे उपविभागीय अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविले आहे.

# बाल शक्ती पुरस्कार; ऑनलाईन अर्ज आमंत्रित

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** केंद्र शासनाच्या महिला व बालविकास विभागामार्फत बाल शक्ती पुरस्कार पुरस्कार दिला जातो. या पुरस्कारासाठी पात्र मुलांचे अर्ज ऑनलाईन ३१ जुलै २०२५ पर्यंत सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारासाठी ५ वर्षे पेक्षा अधिक आणि १८ वर्षापर्यंतच्या मुलांनी शिक्षण, कला, सांस्कृतिक कार्य, खेळ नाविन्यपूर्ण शोध, सामाजिक कार्य आणि शौर्य अशा क्षेत्रात विशेष नैपूण्यपूर्ण कामगिरीसाठी हा पुरस्कार दिला जातो. प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२५ करीता केंद्र शासनाने अर्ज मागविलेले आहे. सदरचे अर्ज www.awards.gov.in या संकेतस्थळामार्फत ऑनलाईन पध्दतीने स्विकारले जाणार आहे. मुलांचे वय ५पेक्षा अधिक व ३१ जुलै २०१५ रोजी १८ वर्षापेक्षा कमी आहे व ज्या मुलांनी शिक्षण, कला, सांस्कृतिक कार्य, खेळ, नाविण्यपुर्ण शोध, सामाजिक कार्य व शौर्य अशा क्षेत्रात विशेष नैपुण्यपुर्ण कामगिरी केलेली आहे त्यांचे प्रस्ताव ऑनलाईन स्वतः मुले किंवा त्यांच्या वतीने राज्य सरकार, केंद्र शासित प्रदेश, जिल्हाधिकारी, जिल्हादंडाधिकारी, पंचायत राज्य संस्था, नागरी स्वराज्य संस्था, शैक्षणिक संस्था इ. अर्ज करु शकतात. जिल्ह्यातील अशा प्रकारच्या जास्तीत जास्त मुलांचे प्रस्ताव सादर करण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे.

# पाणीटंचाईच्या नावावर लाखोचा खर्च व्यर्थ शासकीय यंत्रणेच्या कामकाजात जनता त्रस्त

दैनिक आपला विदर्भ








देविदास खनपटे
मुख्य संपादक

**मेहकर :** नागरिकांची वर्षानुवर्षाची पायपीट थांबावी, त्यांना मुबलक व शुद्ध पाणी मिळावे, यासाठी जलजीवन मिशन योजनेअंतर्गत प्रत्येक गावागावात कोट्यावधी रुपयाचा निधी मंजूर करण्यात आला. मात्र, शासकीय यंत्रणेच्या गौडबंगाल कारभारात हा निधी व्यर्थ गेला की काय असे चित्र तालुक्यात दिसून येत असून तब्बल सात विहिरी कोरड्या गेल्याने नागरिकांची पिण्याच्या पाण्यासाठी होणारी पायपीट कायम राहिली आहे. तर, शासनाचा कोट्यावधी रुपयांचा निधी हा व्यर्थ खर्च झाल्याचा आरोप जनतेकडून होत आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना शुद्ध व मुबलक पाण्याचा पुरवठा व्हावा, यासाठी केंद्र शासनाच्या वतीने जलजीवांविषयी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येक गावात नवीन पाणीपुरवठा योजना राबविण्यात येत आहे. विहर खोदकाम नवीन पाईप लाईन प्रत्येक घराला नळाद्वारे पाणीपुरवठा आदी कामे या योजनेअंतर्गत करण्यास गत दोन वर्षांपासून प्रारंभ करण्यात आला आहे. मात्र, शासकीय प्रशासकीय यंत्रणेच्या कामचलाऊ धोरणाने तालुक्यातील अपवाद वगळता बहुतांश गावातील योजना ह्या अद्यापही अपूर्ण आहेत. रखडलेल्या योजना पूर्ण करण्यासाठी शासन स्तरावरून वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली आहे. मात्र, असे असतानाही सदर योजना पूर्णत्वास गेल्या नाहीत. अनेक गावात विहिरीचे खोदकाम करण्यात आले. मात्र, पाणीपुरवठा करण्यात आला नाही. काही विहिरी कोरड्या गेल्या. त्यामुळे जल स्त्रोतांचे ठिकाण बदलून नव्याने विहिरीचे खोदकाम करण्याचा प्रस्ताव दाखल करण्यात आला.शासकीय गोड गोड बंगाल कारभार मात्र, जनतेची पाण्यासाठी पायपीट कायम राहिली आहे. तालुक्यातील सात गावात जल जीवन मिशन अंतर्गत खोदकाम करण्यात आलेल्या विहिरी ह्या कोरड्या गेल्याने पाण्याचे समस्या कायम राहिली आहे. आता संपूर्ण उन्हाळा हा पाणीटंचाई गेलेला असताना आता पावसाळा हा सुद्धा दूषित पाणी पिण्यात जातो की, काय असा प्रश्न जनतेमध्ये उपस्थित होत आहे. तालुक्यातील सात विहिरी खोदकाम करण्यासाठी लाखो रुपयांच निधी खर्च करण्यात आला आहे.मात्र, समस्या कायम असल्याने जनतेचे हाल पाण्यासाठी यापुढेही कायम राहणार असल्याचे चित्र तालुक्यातील दिसून येत आहे.

### पाणीटंचाईचा उन्हाळा कायम

गावातील पाणीटंचाई निवारण्यासाठी जलजीवन मिशन योजना राबवून त्यासाठी लाखो रुपयांच निधी खर्च करण्यात आला आहे. मात्र, शासन प्रशासनाच्या उदासीन धोरणामुळे सदर योजना ही अपवाद वगळता तालुक्यात कुठेही पूर्णत्वास केली नाही. त्यामुळे वर्षानुवर्षाची सुरू असलेली पाणीटंचाई कायम राहिली आहे.यावर्षीचा उन्हाळा पाण्यात टंचाईच्या झळा सहन करत नागरिकांनी काढला. आता पावसाळाही पाणीटंचाईचा उन्हाळा कायम राहणार असल्याचे चित्र तालुक्यात दिसून येत आहे.

## विविध वृत्त...

### बहुजन मुक्ती मोर्चाचे उपविभागीय कार्यासमोर निदर्शने






दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्यभरातील शासनाच्या वन व महसुल जमिनीवरील प्रलंबित वनदावेदारांना मशागत व पेरणी परवानगी सह वन विभाग अन्याय जमिन कायम पट्टे व निवासी अतिक्रमण भुखंड पट्टे, शेतकरी कर्ज मुक्ती प्रमाणे राज्यातील भुमिहीन स्त्री व पुरुषाचे भुमिहीनाचे १०० टक्के कर्ज मुक्ती करा. मा. सर्वोच्च न्यायालय निर्णयानुसार तथा मा. उच्च न्यायालय निर्णय जिल्हाधिकारी कडून होणाऱ्या कार्यवाहीस स्थगिती देऊन राज्यशासनाने १९९० पुर्वीच अतिक्रमण जमिन धारकांच्या बाबत सर्वोच्च न्यायालयात दाद मागावी, शासन निर्णय मुख्यमंत्री सौर कृषी वाहिणी योजना निर्णय रद्द करा, अशा विविध मागण्यांसाठी बहुजन मुक्ती मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष प्रदीप अंभोरे यांच्या नेतृत्वात खामगाव येथील उपविभागीय कार्यालयासमोर जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. मागण्या पूर्ण न झाल्यास येत्या काळात मुंबई येथे तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा सुद्धा यावेळी देण्यात आला आहे.

### १४ जून पासून राज्यभर आंदोलन करण्यात येईल, प्रहार पदाधिकाऱ्यांची पत्रकार परिषदेत माहिती



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी मागील पाच दिवसांपासून गुरुकुंज मोझरी येथे शेतकरी, शेतमजूर, कामगार, दिव्यांग, विधवा अशा अनेक मागण्यांना घेऊन अन्नत्याग आंदोलन सुरु केले आहे. मात्र, गेल्या पाच दिवसांपासून सरकारने अद्यापही त्यांच्या आंदोलनाची दखल घेतलेली नाही. त्यामुळे आता १४ जून पासून राज्यभर आंदोलन करण्यात येईल, असा इशारा प्रहार पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत दिला. आज राज्यातील सर्व शेतकरी संघटनांच्या नेत्यांसोबत, तसेच इतर पक्ष पदाधिकाऱ्यांसोबत संपर्क साधून त्यांना या आंदोलनात सहभागी करून घेतले जाणार आहे. ही लढाई केवळ प्रहारची नाही तर सर्वांची आहे. शेतकरी, शेतमजूर दिव्यांग यांना कुठलीच जात नसते. त्यामुळे सर्वांना यामध्ये सहभागी व्हावे लागणार आहे. ही आरपारची लढाई असेल. १४ तारखेनंतर आंदोलन आणखी तीव्र होईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

### अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्याला गारपीट; सोसाट्याचा वारा आणि पाऊस झाल्याने नागरिकांची तारांबळ





**अकोला/प्रतिनिधी :** अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्याला आज गारपिटीने आज चांगलंच झोडपलंय. तालुक्यातील शिवपुर, बोर्डी, अकोली जहागीर, पोपटखेड सह अनेक गावांना गारपिटीचा जोरदार तडाखा बसलाय. गारपीटी सोबतच सोसाट्याचा वारा आणि पाऊस झाल्याने नागरिकांची मोठी तारांबळ उडालीय. फळ आणि भाजीपाला पिकांचं मोठं नुकसान झालंय. पाच दिवसाच्या विश्रांतीनंतर कालपासून अकोला जिल्ह्यातील अनेक भागात पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्याने हजेरी लावलीय. अनेक ठिकाणी झाडे पडल्याने वाहतूक विस्कळीत झाली आहे.